प्रेसनोट

दि.१४/०८/२०२२

# सहायक पोलीस आयुक्त कार्यालय - कोथरूड विभाग, पुणे शहर येथील पोलीस हवालदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १८७/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - विजय एकनाथ शिंदे, वय - ४८ वर्षे<br>पद - पोलीस हवालदार.<br>नेमणूक - सहायक पोलीस आयुक्त कार्यालय - कोथरूड विभाग. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- १२/०८/२०२२

सापळा दिनांक :- १३/०८/२०२२.

ठिकाण :- सहायक पोलीस आयुक्त कार्यालय - कोथरूड विभाग, पुणे शहर.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व त्यांचा मित्र यांच्यावर असलेल्या चॅप्टर केसमध्ये हजर करून घेण्यासाठी व जामीनास मदत करण्यासाठी लोकसेवक पोलीस हवालदार शिंदे यानी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार व त्यांचा मित्र यांच्यावर असलेल्या चॅप्टर केसमध्ये हजर करून घेण्यासाठी व जामीनास मदत करण्यासाठी लोकसेवक पोलीस हवालदार विजय शिंदे यानी तक्रारदार यांचेकडे ५ हजार रूपयेची लाचेची मागणी करून ती लाच स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवकास अटक करून मा. विशेष न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दि. १६/०८/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.


७. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४

८. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

९. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३

१०. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००

११. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**

१२. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**


(श्रीहरी पाटील)

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.